महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/२८/पोमसं दौरा/कार्यपध्दती/२०२६/ मुंबई. दि.१८/०६/२०२६

विषय : मा. श्री. सदानंद दाते, भापोसे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या विविध शासकीय बैठका, दौरे व भेटीच्या वेळी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत.

मा. श्री. सदानंद दाते, भापोसे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य हे शासकीय कामकाजाच्या अनुषंगाने राज्यातील विविध पोलीस घटकांना भेटी देत असतात, तसेच विविध शासकीय कार्यक्रम, बैठका, आढावा दौरे, वार्षिक निरीक्षणे व अन्य शासकीय कामकाजानिमित्त राज्यातील विविध जिल्हे व शहरांमध्ये प्रवास करीत असतात. अशा प्रसंगी विमानतळ, रेल्वे स्थानक अथवा इतर आगमन/प्रस्थान स्थळांवर संबंधित पोलीस घटकातील वरिष्ठ अधिकारी शिष्टाचाराचा भाग म्हणून उपस्थित राहत असतात. तसेच त्यावेळी पुष्पगुच्छ व भेटवस्तू इ. देण्याची प्रथा देखील काही ठिकाणी आढळून येते. शासकीय कामकाजातील सुसूत्रता, वेळेचा कार्यक्षम वापर व अनावश्यक शिष्टाचार टाळण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. पोलीस महासंचालक यांच्या आगमन अथवा प्रस्थान प्रसंगी संबंधित ठिकाणी फक्त पोलीस अधीक्षक दर्जाचा एक अधिकारी उपस्थित राहणे पुरेसे राहील.

२. ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्राशी अथवा कार्यक्रमाशी संबंधित कामकाज असेल, अशाच अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे. इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केवळ स्वागत अथवा निरोप देण्यासाठी उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही.

३. पोलीस महासंचालक भेट देत असलेल्या ठिकाणी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना पोलीस महासंचालक यांना भेटण्यासाठी निश्चित वेळ आणि ठिकाण राखुन ठेवले जाईल. तेथे अथवा भेटीची पुर्व अनुमती घेऊन पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना भेटावे.

४. पोलीस महासंचालक यांच्या स्वागतासाठी पुष्पगुच्छ, भेटवस्तू आणू नयेत.

५. दौऱ्यादरम्यान निवास, भोजन, वाहतूक व इतर आवश्यक त्या व्यवस्थांबाबतची माहिती या कार्यालयाकडून अथवा संबंधित शाखेमार्फत प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्या व्यवस्था नियमानुसार करण्यात याव्यात.

2723
17/6/26

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

६. पोलीस महासंचालक यांच्या वार्षिक निरीक्षण (Annual Inspection) कार्यक्रमाच्या वेळीच नियमानुसार Guard of Honour प्रदान करण्यात यावा. वार्षिक निरीक्षणाव्यतिरिक्त इतर सर्व बैठका, आढावा, दौरे, शासकीय कार्यक्रम/भेटी अथवा प्रवासाच्या प्रसंगी Guard of Honour आयोजित करण्यात येऊ नये.

७. सर्व घटक प्रमुखांनी वरील सूचनांची अधिनस्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य ती माहिती देऊन काटेकोर अंमलबजावणी करावी.

सदर सूचना तात्काळ प्रभावाने लागू होतील.

Gautam

(लखमी गौतम)
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व सु.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांचेकरिता

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (मुंबई शहर वगळून)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
अपर पोलीस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस महासंलचाल व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्ग)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते २०

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रकाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner